26-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/26/2025 12:11 AM Page 1



साळवली धरण १२ दिवस आधी ओव्हरफ्लो ! पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा इंग्लंडवर दणदणीत विजय पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २६ जून २०२५ । पाने ४ । ₹ ४

। REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 । Volume 13, Issue 294 । Verna, । facebook.com/dainikherald । Thursday 26 June 2025 । Pages 4 । ₹ 4

## निवडक

### खाद्यतेलांचे ६५ हजारांचे करार रद्द; इराण-इस्रायल युद्धामुळे दर गगनाला भिडले

**नवी दिल्ली, दि. २५ :** इराण-इस्रायल युद्धाचे परिणाम भारतावर होऊ लागले आहेत. प्रामुख्याने खाद्यतेलाच्या दरात आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी वाढ झाल्याने आयातदारांनी ६५ हजार टनांचे करार रद्द केले आहेत.

या युद्धामुळे येत्या काळात इंधन महागण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे जगभरातील प्रमुख खाद्यतेल आयातदार देशांनी पामतेलाचा उपयोग जैवडिझेलसाठी करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात पामतेलच्या दरात अचानक मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे तेल आयात करण्यास तयार नाहीत, असे अखिल भारतीय खाद्यतेल महासंघाचे म्हणणे आहे.

मे महिन्यात पामतेलाचे दर नीचांकावर होते. आता मात्र त्यात एकाएकी ८ टक्क्यांची वाढ झाली आहे. त्यामुळेच आयातदारांनी ६५ हजार टनांचे करार रद्द केले आहेत. हे सर्व करार जुलै ते ऑक्टोबरदरम्यान होणार होते', असे महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शंकर ठक्कर यांनी सांगितले.

भारत हा जगातील सर्वाधिक खाद्यतेल आयातदार देश आहे. भारतात ६५ टक्के खाद्यतेल आयात पामतेलाची असते. वार्षिक एकूण ७.५० लाख टन खाद्यतेल आयात होताना ६५ हजार टनाचे करार रद्द होणे, हा मोठा आकडा असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

### ॲक्सिओम-४ मिशनने पृथ्वीची कक्षा ओलांडली

**नवी दिल्ली, दि. २५ :** भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला, पोलिश अंतराळवीर स्लावोज उझ्नान्स्की, हंगेरियन अंतराळवीर टिबोर कापू आणि अमेरिकेचा अंतराळवीर पेगी व्हिटसन हे चौघे नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून स्पेसएक्सच्या क्रू ड्रॅगन उ२१३ अंतराळयानाद्वारे दुपारी बारा वाजून एक मिनिटाने उ२१३ अंतराळयानाद्वारे २८ तासांच्या प्रवासाला रवाना झाले.

यान २८ तासांचा प्रवास करुन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचेल. तिथे पोहोचताच यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला जोडले जाईल. ही डॉकिंगची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यानातील अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात प्रवेश करतील.

ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे १९८४ नंतर अंतराळात जाणारे भारताचे दुसरे आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले राष्ट्रीय अंतराळवीर आहेत. याआधी १९८४ च्या एप्रिल महिन्यात रशियाच्या यानातून भारतीय अंतराळवीर राकेश शर्मा अंतराळात गेले होते. यामुळे भारतीयांचे लक्ष ॲक्सिओम-४ मिशनकडे आहे.

अंतराळयानाने ७००० किलोमीटर वेगाने पृथ्वीची कक्षा ओलांडली. आता यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने वेगाने प्रवास करत आहे.

केनेडी स्पेस सेंटरमधील लाँच पॅड ३९ हे नासाच्या सर्वात प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक प्रक्षेपण स्थळांपैकी एक आहे. याच ठिकाणाहून नील आर्मस्ट्राँग आणि त्यांचे साथीदार १९६९ मध्ये चंद्रावर गेले होते. आता याच प्रक्षेपण स्थळावरुन ॲक्सिओम-४ मिशनचे प्रक्षेपण झाले आहे.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात करणार ६० प्रयोग

ॲक्सिओम-४ मोहिमेला घेऊन जाणारे ड्रॅगन अंतराळयान गुरुवार, २६ जून रोजी भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ४.३० वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणार आहे. अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचल्यानंतर १४ दिवसांत ६० प्रयोग करणार आहे. प्रयोगांद्वारे वैज्ञानिक संशोधन केले जाणार आहे. पृथ्वीपासून कमी अंतरावरील कक्षेतले गुरुत्वाकर्षण या विषयाशी संबंधित संशोधन प्रामुख्याने केले जाणार आहे.

# इराण-इस्रायल संघर्ष सुरूच

## पुढील आठवड्यात चर्चा होण्याची शक्यता

**नवी दिल्ली, दि. २५ :**

**पश्चिम आशियातील तणावपूर्ण वातावरणात मोठी घडामोड घडत असून, अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षावर पडदा पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नेदरलँड्समधील नाटो शिखर परिषदेत बुधवारी सांगितले की, आम्ही पुढच्या आठवड्यात इराणसोबत चर्चा करणार आहोत. करारावर स्वाक्षरी होईल का माहीत नाही, पण आम्ही पुन्हा एकच गोष्ट मागणार आहोत की , आम्हाला अणुशस्त्र नको आहेत.**



दरम्यान, ट्रम्प यांनी अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्याची तुलना थेट हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकलेल्या अणुबॉम्बशी केली. मला ती उदाहरणे द्यायची नाहीत, पण हे हल्ले युद्ध समाप्तीचे कारण ठरले, हे सत्य आहे, असे ट्रम्प म्हणाले.

२२ जून रोजी अमेरिकेच्या बी - २ बॉम्बर्सने इराणच्या अणुसंस्थांवर हल्ला केल्यानंतर, इराणने तत्काळ प्रत्युत्तर दिले. सोमवारी रात्री भारतीय वेळेनुसार १० वाजता इराणने कतारमधील अमेरिकेच्या अल उदेद हवाई तळावर सहा क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. इराणच्या सरकारी माध्यमांच्या मते, यशस्वी प्रतिहल्ल्यानंतर इस्रायलवर युद्धबंदी लादण्यात आली.

ट्रम्प यांनी दावा केला की, अमेरिकेच्या हल्ल्याने इराणचे अणुस्थळ आभासी नामशेष झाले. वरून पाहिले तर सर्व काही जळून गेले आहे . झाडे, रचना, सर्व काळवंडलेले, असे ट्रम्प म्हणाले. पेंटॅगॉनच्या डिफेन्स इंटेलिजेंस एजन्सीचा गुप्त अहवाल मात्र वेगळं चित्र मांडतो. त्यानुसार, इराणच्या अणुकार्यक्रमातील मुख्य घटकांना फारसं नुकसान झाले नसून हा कार्यक्रम फक्त काही महिन्यांनी मागे पडला आहे.

इस्रायलच्या संरक्षण मंत्री योआव्ह गॅलंट यांनी इराणच्या सेंट्रल बँकसह, शाहर बँक, मेलाट बँक व तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना दहशतवादी संस्था आणि व्यक्ती' म्हणून घोषित केले आहे. या घोषणेमुळे इराणच्या आर्थिक व्यवहारांवर आणखी बंधने येण्याची शक्यता आहे. इस्रायली गुप्तचर संस्थांच्या मागणीनुसार ही कारवाई करण्यात आली असल्याचे संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले.

इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी इस्रायलने युद्धबंदी भंग केल्याशिवाय इराण कोणतीही आक्रमक कृती करणार नसल्याचे स्पष्ट केले. आम्ही युद्धबंदीचे पालन करू, जोपर्यंत पान २ ▶





# राज्याच्या मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षेला भगडाड !

## कोलवाळ कारागृहाच्या भिंतींवरून आत फेकण्यात आले ड्रग्ज

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २५ :** कोलवाळ येथील मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षेचा बोजवारा उडाल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. अंमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी ड्रग्ज तस्करांनी थेट हवाई मार्गाचा वापर करत गांजाची पाकिटे या कारागृहाच्या भिंतींवरून आतल्या कैद्यासाठी फेकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. १४ जून रोजी पहाटे सुमारे १.४० लाख रुपये किमतीची गांजाची सात पाकिटे तुरुंगाच्या भिंतीवरून आत फेकण्यात आली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली.

ही कारवाई तुरुंगातील एका कैद्याला गांजाची पाकिटे पोहोचवण्यासाठी करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, वॉच टॉवर क्रमांक ३ वर तैनात असलेल्या सतर्क सुरक्षा रक्षकाच्या लक्षपूर्वक निरीक्षणामुळे हा प्रयत्न हाणून पाडण्यात यश आले. संबंधित रक्षकाला टॉवर क्रमांक ३ आणि ४ दरम्यानच्या रस्त्यावर तटबंदीच्या आतील आणि बाहेरील भिंतींमध्ये



संशयास्पद वस्तू दिसून आल्या. त्याने तत्काळ ही माहिती वरिष्ठ तुरुंग अधिकाऱ्यांना दिली.

नंतर झालेल्या तांत्रिक विश्लेषणानंतर व पोलिस तपासात या प्रकारामागे असलेल्या तस्करीच्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात यश आले. या कारवाईत पोलिसांनी चार जणांना अटक केली असून, त्यात एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे.

अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे पुढीलप्रमाणे आहेत: गौतम तलवार (२४), सॅम्युअल पुजारी (२४) हे दोघेही अनसाभट, म्हापसा येथील रहिवासी; जाफर मुल्ला (२४), रा. खोर्ली, तर अल्पवयीन आरोपीची ओळख कायद्यानुसार गोपनीय ठेवण्यात आली असून, त्याला बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तस्करीसाठी कारागृहाच्या भिंतीवरून गांजाची पाकिटे फेकण्यात आल्याची ही पहिलीच घटना नसून, या टोळीचा पूर्वीच्या अशाच प्रयत्नांशी काही संबंध आहे का, याचा सखोल तपास सध्या सुरू आहे.

या घटनेनंतर तुरुंग परिसरातील सुरक्षेचा आढावा घेण्यात येत असून, यापुढे अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी अतिरिक्त खबरदारी घेतली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# पाटो जलमय : स्मार्ट सिटीच्या पाण्यात अडकले नागरिक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २५ :** राजधानी पणजीच्या मध्यवर्ती पाटो परिसरात गेली चार वर्षे साचलेल्या पाण्याच्या समस्येवर स्थायी उपाय करण्याचे आश्वासन महापौर रोहित मोन्सेरात यांनी दिले असले तरी, प्रत्यक्षात स्थिती बदललेली नाही. आजही हलक्याशा पावसानंतरही रस्ते जलमय होत आहेत आणि नागरिकांना, तसेच कार्यालयात जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे . इतकेच नाही तर या परिसरात सांडपाण्याचे चेंबर्स लिकेज झाल्यामुळे नागरिकांना भयंकर दुर्गंधीला सामोरे जावे लागत आहे .



राज्य शासनाच्या विविध महत्त्वाच्या कार्यालयांसह खाजगी कंपन्यांची कार्यालये आणि हॉटेल व्यवसाय असलेला पाटो परिसर, नेहमीच पाण्याखाली जातो , तसा तो यावर्षी देखील गेला . एकेकाळी आर्थिक विकास महामंडळाने सरकारी कार्यालयांचे स्थलांतर करण्यासाठी विकसीत केलेला हा वाणिज्यिक पट्टा, ईडीसीच्या आर्थिक अडचणीमुळे कॉर्पोरेट कंपन्यांना विकावा लागला. मात्र, यानंतर येथे नागरी सुविधांकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले, विशेषतः रस्ते आणि जलनिस्सारण व्यवस्था पूर्णपणे ढासळली.

स्थानिक नागरिकांनी आणि कर्मचारी वर्गाने व्यक्त केलेल्या भावना अत्यंत संतापजनक आहेत. पावसाचं काही घेणंदेणं नसतं . इथं तर मे महिन्यातही रस्ते जलमय होतात, असे एक सुरक्षा रक्षक रोहित नाईक सांगतात. सांडपाण्याच्या नाल्यांतून पाणी ओसंडून वाहते आणि परिसरात असह्य दुर्गंधी पसरते. सकाळी थोडा पाऊस झाला, की रस्ते गुडघाभर पाण्याखाली जातात. त्यामुळे स्कूटर घसरून पडण्याच्या अनेक घटना घडतात, असे स्थानिक रहिवासी आणि कामगार सांगतात.

गोवा सरकार राजधानीला स्मार्ट सिटी' म्हणून गौरवते, पण त्याच राजधानीत पाटो सारखा महत्त्वाचा परिसर दरवर्षी जलमय होतो. हे विरोधाभास नव्हे का? असा संतप्त सवाल रहिवासी मोहित सावईकर यांनी केला. त्यांच्या मते, ही केवळ वर्षांनुवर्षांची दुर्लक्षाची परिणती आहे.

२०२३ मध्ये मेरशी सर्कल आणि हिरा पेट्रोल पंपाजवळील महामार्ग भागातील खारफुटी क्षेत्रात अज्ञात व्यक्तींनी मोठ्या प्रमाणावर बांधकामाचा कचरा टाकल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे नैसर्गिक जलवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होऊन परिसरात जलसाठा अधिकच वाढला.

या संदर्भात संपर्क साधल्यावर महानगरपालिकेचे अधिकारी म्हणाले की, पाटो हा सखल भाग असल्यामुळे पावसाशिवायही येथे पाणी साचते. जलसंपदा विभाग या परिसरात पंप रूम उभारण्याचा विचार करत आहे. यामुळे अंशतः समस्येवर उपाय होईल.

मात्र, नागरिकांचा विश्वास उडालेला दिसतो. प्रशासन फक्त योजना आखते, प्रत्यक्ष अंमलबजावणीला वेळ लागतो . तोपर्यंत आम्ही पाण्यातच राहणार का? असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे.

# गोव्यात शेतीसाठी सौरऊर्जेचा अवलंब : नाबार्डची पहिली बैठक

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. २५ :** राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), गोवा शाखेने नुकतीच गोव्यात सौर क्षमता वाढवणे: भागधारक भागीदारी आणि समुदाय सहभाग वाढवणे या विषयावर पहिली प्रादेशिक सल्लागार समिती बैठक मडगाव येथे आयोजित केली. राज्यातील शेती आणि मत्स्य व्यवसायात सौरऊर्जेच्या प्रभावी वापराबाबत धोरणात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी सरकारी अधिकारी, वित्तीय संस्था, शास्त्रज्ञ आणि शेतकरी एकाच मंचावर आले होते.

या बैठकीत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले भारतीय कृषी संशोधन परिषद, केंद्रीय किनारी कृषी संशोधन संस्था, गोवा चे संचालक डॉ. परवीन कुमार यांनी सौरऊर्जेचा शेती क्षेत्रात संभाव्य वापर कसा किफायतशीर आणि पर्यावरणपूरक ठरू शकतो, यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सौरऊर्जेवर चालणारे ड्रायर आणि सिंचन प्रणाली मध्ये यशस्वीपणे राबवलेल्या प्रकल्पांचा उल्लेख करत शेतकऱ्यांना होणारे प्रत्यक्ष फायदे उलगडून दाखवले.

बैठकीच्या सुरुवातीला नाबार्ड गोवाचे महाव्यवस्थापक संदीप धारकर यांनी सर्व सहभागी घटकांचे स्वागत करत बैठकीची उद्दिष्टे स्पष्ट केली. या चर्चासत्रात गोवा राज्य सहकारी बँक, गोवा ऊर्जा विकास संस्था , नवीन आणि अक्षय ऊर्जा विभाग, कृषी संचालनालय, स्टेट बँक ऑफ इंडिया , विविध बँक प्रतिनिधी आणि शेतकरी यांची उपस्थिती नोंदवण्यात आली.

या कार्यक्रमात केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री कुसुम योजना मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकाशन करण्यात आले. यामार्फत शेती क्षेत्रात सौरऊर्जा वापराची व्यावहारिक अंमलबजावणी करण्यासाठीची चौकट तयार करण्यात आली आहे. याशिवाय गोव्यातील मत्स्य व्यवसायासाठी विशेष तयार करण्यात आलेल्या अक्षय ऊर्जा आणि स्वच्छ तंत्रज्ञानाच्या रोडमॅपचे अनावरणही यावेळी करण्यात आले.

बैठकीत सौरऊर्जेच्या वापरामुळे शेतीच्या कामकाजातील खर्च कसा कमी करता येईल, यावरील व्यावहारिक उपायांवर भर देण्यात आला. या प्रादेशिक सल्लागार समितीमुळे गोव्यातील शेती आणि मत्स्य व्यवसाय क्षेत्रात सौरऊर्जेच्या वापराला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ही बैठक म्हणजे संशोधन संस्था, बँका, सरकारी विभाग आणि शेतकरी यांच्यातील सहकार्याचे ठोस पाऊल असल्याचे नाबार्डने स्पष्ट केले. यामुळे राज्यातील कृषी व्यवहार अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक बनवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे.

# मडगाव नगरपरिषद निवडणुकीपूर्वी राजकीय हालचालींना वेग

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २५ :** येणाऱ्या मडगाव नगरपरिषद निवडणुकीत मडगाव आणि कुडतरी येथून सक्रियपणे सहभागी होण्याचा निर्धार गोवा फॉरवर्ड पार्टीचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी जाहीर केल्यानंतर स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे. सरदेसाई यांच्या या घोषणेमूळे २५ सदस्यीय मडगाव नगरपरिषदेवरील भाजपच्या पकडीला आव्हान निर्माण झाले असून, २०२७ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी व्यापक राजकीय समीकरणांची चाचणी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पूर्वी काँग्रेस आणि गोवा फॉरवर्ड पार्टी युतीच्या बळावर नगरपरिषद नियंत्रित करणाऱ्या सरदेसाई यांनी आता भाजपच्या वर्चस्वाला आव्हान देण्याचे निश्चित केले आहे. फातोर्डा मतदारसंघातील ११ वॉर्डांमध्ये आपली ताकद अजूनही कायम असली, तरी बहुमतासाठी जीएफपीला मडगाव मतदारसंघातील किमान २-३ जागा जिंकणे आवश्यक आहे .

सप्टेंबर २०२२ मध्ये माजी काँग्रेस आमदार दिगंबर कामत यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला. त्यांच्या पाठिंब्याने दामोदर शिरोडकर यांची नगराध्यक्षपदी नियुक्ती झाली. त्यानंतर काही माजी जीएफपी नगरसेवकही भाजपमध्ये सामील झाले, ज्यामुळे जीएफपीची संख्या घटली.

राजकीय विश्लेषकांच्या मते, भाजप सध्या संघटनात्मकदृष्ट्या अधिक भक्कम स्थितीत असून, फातोर्ड्याचे माजी आमदार दामू नाईक यांच्या भाजप प्रदेशाध्यक्षपदाच्या नियुक्तीमुळे दोन्ही मतदारसंघात पक्षाची पकड अधिक घट्ट झाली आहे. दामू नाईक यांचा प्रभाव, स्थानिक पातळीवरील संघटनात्मक ताकद आणि पक्ष संसाधनांवरचा प्रवेश या सर्व बाबी भाजपला फायद्याच्या ठरू शकतात.

दरम्यान, काँग्रेस पक्ष देखील मैदानात उतरल्याचे संकेत मिळाले आहेत. माजी नगराध्यक्ष सॅव्हियो कुतिन्हो आणि अलीकडे पक्षात दाखल झालेले उद्योजक चिराग नाईक यांच्यासह काँग्रेस मडगावमधील वॉर्डांत उमेदवार उभे करण्याची तयारी करत आहे. चिराग नाईक यांनी भाजप आणि कामत यांच्यावर थेट टीका करत तिरंगी लढतीचे संकेत दिले आहेत. त्यामुळे ही निवडणूक भाजप-जीएफपी यांच्यात मर्यादित न राहता काँग्रेससह त्रिकोणी लढतीत रूपांतरित होऊ शकते.

जीएफपीने कुडतरी मधील वॉर्डांमध्ये उमेदवार उभे करण्याची तयारी दर्शवली आहे. मात्र, सध्याचे आमदार रेजिनाल्ड , जे सरकारला बाहेरून पाठिंबा देत आहेत , ते या भागात विशेष सक्रिय नसल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. रेजिनाल्ड यांनी पान २ ▶